महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &
HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE- 411 005

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | E-MAIL - sscboardpune@gmail.com |
|---|---|---|
| 25536722 (OFF) | 25536781/82/83 25536712 (OFF) | |


क्रमांक पुविमं/शाखा डिपी/ 4385
पुणे-४११ ००५
दि.२८/०७/२०२३

प्रति,

सर्व परिरक्षक, केंद्रसंचालक, मुख्याध्यापक.
जिल्हा- पुणे,अहमदनगर व सोलापूर.

विषय- इ.१० वी परीक्षा जुलै/ऑगस्ट २०२३ मधील दि.२८/०७/२०२३ रोजीच्या वेळापत्रकातील बदलाबाबत.

संदर्भ- क्र.रा.मं./परीक्षा-६/३३२५ दि.२७/०७/२०२३ चे पत्र.

सादर-

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, राज्यातील काही जिल्ह्यामध्ये दि.२८/०७/२०२३ रोजी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आलेला आहे. त्यामुळे माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेतील दि.२८/०७/२०२३ रोजीच्या वेळापत्रकामध्ये बदल करण्यात आला आहे. तरी दि.२८/०७/२०२३ रोजीचे इ.१०वी चा सामाजिक शास्त्रे पेपर १ इतिहास व राज्यशास्त्र या विषयाचा पेपर दि.०३/०८/२०२३ रोजी सकाळ सत्र ११.०० ते १.०० या वेळेत घेण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी व याबाबत आपण आपल्या कार्यकक्षेतील परीक्षेसंदर्भातील सर्व घटकांना अवगत करावे.

सोबत- वेळापत्रक बदलाबाबतचे परिपत्रक.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११००५.

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव-

१) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद- पुणे, अहमदनगर, सोलापूर.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) जुलै—ऑगस्ट २०२३ पुरवणी परीक्षेच्या
वेळापत्रकातील बदलाबाबत

# प्र क ट न

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत जुलै—ऑगस्ट २०२३ मध्ये घेण्यात येणारी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) दि. १८/०७/२०२३ ते दि. ०१/०८/२०२३ व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पुरवणी परीक्षा दि. १८/०७/२०२३ ते दि. १०/०८/२०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर परीक्षेचे वेळापत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले असून शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात आलेले आहे तथापि राज्यातील काही जिल्हयामध्ये दि. २८/०७/२०२३ रोजी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आलेला आहे.

सबब माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) पुरवणी परीक्षेतील दि. २८/०७/२०२३ रोजीच्या वेळापत्रकामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी)

| वेळापत्रकामध्ये निश्चित केलेला दिनांक<br>विषय, वार, दिनांक, सत्र व वेळ | वेळापत्रकाबाबत सुधारीत तपशील<br>विषय, वार, दिनांक, सत्र व वेळ |
|---|---|
| सामाजिक शास्त्रे पेपर १<br>इतिहास व राज्यशास्त्र<br>शुक्रवार, दि.२८ जुलै २०२३<br>सकाळ सत्र ११.०० ते १.०० | सामाजिक शास्त्रे पेपर १<br>इतिहास व राज्यशास्त्र<br>गुरूवार दि. ०३ ऑगस्ट २०२३<br>सकाळ सत्र ११.०० ते १.००<br>या वेळेत घेण्यात येतील |

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) पुरवणी परीक्षा लेखी व अन्य परीक्षेच्या उर्वरित वेळापत्रकामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तरी वेळापत्रकातील उपरोक्त बदलाची सर्व संबंधित माध्यमिक शाळा, मुख्याध्यापक, विद्यार्थी, पालक, परिरक्षक, केंद्र संचालक व अन्य संबंधित घटक यांनी नोंद घ्यावी.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे —४.